सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग

# सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९

# मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६०

(दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पर्यंत सुधारलेला)

# Bombay Act No. XIX of 1960

# The Bombay Khadi and Village Industries Act, 1960

(*As modified up to 1st February 1989.*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याकडून भारतात मुद्रित
व संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित

१९८९

[किंमत : रु. १.८०]

# मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६०

## अनुक्रमणिका

उद्देशिका

### प्रकरण एक

### प्रारंभिक

कलमे


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

व्याख्या.


### प्रकरण दोन

### मंडळाची स्थापना, त्याचे कायद्याने संस्थापन व त्यची रचना


३. मंडळाची स्थापना व त्याचे कायद्याने संस्थापन करणे,

४. मंडळाची रचना.

४-अ. सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

४-ब. सदस्याने अधिकारपदाचा राजीनामा देणे.

५. रिकामी जागा शक्य तितक्या लवकर भरणे.

६. कार्यवाही उचित व विधिग्राह्य आहे असे गृहीत धरणे.

६-अ. विशिष्ट प्रयोजनासाठी म्हणून व्यक्तींना मंडळाशी तात्पुरते संबद्ध करून घेणे.

६-ब. परिषदेची रचना.

७. मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त सल्लागार आणि इतर अधिकारी व कर्मचारी आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती.

७-अ. जिल्हा समित्यांची रचना आणि त्यांचे अधिकार व कार्ये.

८. समित्यांची नेमणूक.

९. मंडळाच्या व परिषदेच्या सभा.

१०. संविदा करण्याचा अधिकार.


### प्रकरण तीन

### मंडळाची कार्ये व अधिकार


११. मंडळाची कार्ये .. .. .. ..

१२. मंडळाचे सर्वसाधारण अधिकार .. .. ..


### प्रकरण चार

### कार्यक्रम आखणे व सादर करणे


१३. वार्षिक कार्यक्रम आखणे व सादर करणे .. .. ..

१४. कार्यक्रमास मंजुरी देणे .. .. .. ..

१५. अनुपूरक कार्यक्रम .. .. .. ..

कलमे

प्रकरण पाच

वित्त व्यवस्था, लेखे, लेखापरीक्षा व ऋणे


१६. मालमत्तेचे हस्तांतरण.

१७. मंडळाचे निधी.

१७-अ. मंडळाचा राखीव निधी.

१८. निधी आणि मालमत्ता यांचे उपयोजन.

१९. मंडळास अर्थसहाय्य व कर्जे देणे.

१९-अ. संशोधन व प्रयोग यासाठीचा खर्च.

२०. अर्थसंकल्प.

२१. अर्थसंकल्पास मंजुरी देणे.

२२. अनुपूरक अर्थसंकल्प.

२३. वार्षिक अहवाल.

२४. आणखी अहवाल, आकडेवारी व विवरणपत्रे.

२५. लेखे व लेखापरीक्षा.


प्रकरण सहा

संकीर्ण


२६. राज्य शासनाने निदेश देणे.

२६-अ. मंडळास येणे असलेल्या पैशांची जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली.

२६-ब. तोटे निर्लेखित करण्याचा मंडळाचा अधिकार.

२७. मंडळाचे सदस्य व मंडळाचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

२८. या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

२९. नियम.

३०. विनियम.

३१. मंडळाचे विसर्जन.

३१-अ. राज्य शासनाचे हक्क व दायित्वे मंडळाकडे हस्तांतरित करणे.

३२. निरसन व व्यावृत्ती.

३३. विद्यमान मंडळ विसर्जित करणे व त्याच्या मत्ता आणि दायित्वे नवीन मंडळाकडे हस्तांतरित करणे.

३४. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३५. शंका दूर करणे.

३६. सन १९६० चा मुंबई अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन.

# सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९[१]

## [मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६०]

[११ एप्रिल १९६०]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याद्वारे अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या :—

खादी ग्रामोद्योग मंडळ (मुंबई, पुणे व पूर्व खानदेश) (पुनर्रचना) आदेश, १९६१*

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ (१–४–७६).†

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ (१–१०–१९७६).†

मुंबई राज्यात खादी व ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देऊन, त्यांचे संघटन, विकास आणि विनियमन करण्याची तरतूद करणे व उक्त उद्देश पार पाडण्यासाठी [२][एका मंडळाची] रचना करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यात खादी व ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देऊन, त्यांचे संघटन, विकास आणि विनियमन करण्याची तरतूद करणे आणि उक्त उद्देश पार पाडण्याकरिता [३][आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता] [२][एका मंडळाची] रचना करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६०, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[४][(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे].

(३) तो, ताबडतोब अंमलात येईल.

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासन राजपत्र** १९६०, भाग पाच, पृष्ठ ३२–३३ (इंग्रजी) पहा.

२. **सन** १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम २ आणि कलम ३(अ) अन्वये "एक किंवा अधिक मंडळाची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम, खादी व ग्रामोद्योग मंडळ (मुंबई, पुणे व पूर्व खानदेश) (पुनर्रचना) आदेश, १९६१ अन्वये दाखल करण्यात आले.

* हा आदेश भारत सरकारची अधिसूचना, गृह मंत्रालय, क्रमांक जी.एस.आर. [एफ ८/१४/६०–एसआर (आर)–२४], दिनांक ११ डिसेंबर १९६१ यामध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता.

† ही अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख होय.

व्याख्या. २. संदर्भावरून अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

[१][ (अ) "मंडळ" म्हणजे या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ; ]

[२][ (अअ) "सभापती" म्हणजे मंडळाचा सभापती;

१९५६ चा ६१. (अब) "आयोग" म्हणजे खादी व ग्रामोद्योग मंडळ अधिनियम, १९५६ अन्वये स्थापना करण्यात आलेला खादी व ग्रामोद्योग आयोग;

(अक) "परिषद" म्हणजे या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग परिषद ; ]

१९६० चा महाराष्ट्र १७. [३][ (अड) "कुटीरोद्योग" म्हणजे, महाराष्ट्र उद्योगांना राज्यसहाय्य अधिनियम, १९६० याच्या कलम २, खंड (ब) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल, असा कुटीरोद्योग;

(अई) "जिल्हा समिती" म्हणजे, कलम ७-अ अन्वये रचना करण्यात आलेली समिती ; ]

(ब) "खादी" म्हणजे भारतात हाताने कातलेल्या कापसाच्या, रेशमाच्या किंवा लोकरीच्या सुतापासून अथवा अशा सुतापैकी कोणत्याही दोन किंवा सर्व सुतांच्या मिश्रणापासून भारतात हातमागावर विणलेले आणि [४][आयोगाने] खादी म्हणून प्रमाणित केलेले कोणतेही कापड [४][आणि त्यात, अशा कापडापासून बनविलेल्या तयार कपड्यांचा समावेश होईल; ]

[५][ (क) "सदस्य" म्हणजे मंडळाचा सदस्य आणि त्यात, मंडळाचा सभापती, उप-सभापती व सदस्य-सचिव किंवा सदस्य-सचिव यांचा समावेश होईल;

(कअ) "सदस्य-सचिव" म्हणजे मंडळाचा सदस्य-सचिव; ]

(ड) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या किंवा केले आहेत असे मानण्यात येणाऱ्या नियमांन्वये विहित केलेले;

(ई) "विनियम" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेले किंवा केले आहेत असे समजण्यात येणारे विनियम;

१९६० चा महा. १७. [६][ (ईअ) "लघु उद्योग" म्हणजे, महाराष्ट्र उद्योगांना राज्यसहाय्य अधिनियम, १९६० याच्या कलम २, खंड (ई) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल असा लघु उद्योग; ]

[७][ (इइ) "उप सभापती" म्हणजे, मंडळाचा उप सभापती; ]

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ४(अ) अन्वये, खंड (अ) हा बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये हे खंड, समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम २(अ) अन्वये खंड (अड) आणि (अई) हे, समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये, "खादी व ग्रामोद्योग मंडळ अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन केलेल्या खादी व ग्रामोद्योग मंडळाने" या मजकुराऐवजी "आयोगाने" हा शब्द दाखल करण्यात आला व "आणि तीत ......... इ." मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ४(ड) अन्वये खंड (क) ऐवजी खंड (क) आणि (कअ) दाखल करण्यात आले.

६. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम २ (ब) अन्वये खंड (इअ हा) समाविष्ट करण्यात आला.

७. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ४ (इ) अन्वये खंड (इइ) हा समाविष्ट करण्यात आला.

[1][(फ) "ग्रामोद्योग" म्हणजे—

(एक) खादी व ग्रामोद्योग आयोग अधिनियम, १९५६ याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले सर्व किंवा कोणतेही उद्योग असा समजावा आणि त्यात उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेअन्वये उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही उद्योगाचा समावेश होतो; अथवा १९५६ चा ६१.

[2][(एक-अ) कोणताही कुटीरोद्योग, लघु उद्योग किंवा हस्तव्यवसाय उद्योग; अथवा]

(दोन) राज्य शासनाने, आयोग आणि मंडळ यांच्याबरोबर विचारविनिमय करून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, याबाबतीत विनिर्दिष्ट केलेला इतर कोणताही उद्योग.]

## प्रकरण दोन

### मंडळाची[3] स्थापना, त्याचे कायद्याने संस्थापन व त्याची रचना

३. [4][(१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे संपूर्ण राज्यासाठी महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ या नावाने संबोधण्यात येणारे एक मंडळ स्थापन करता येईल;] मंडळाची स्थापना व त्याचे कायद्याने संस्थापन.

(२) [5][हे मंडळ] हा निगम निकाय असेल; त्याची अखंड अधिकार परंपरा असेल व त्याची एक सामान्य मुद्रा असेल आणि निगम म्हणून असलेल्या नावाने त्यास व त्याच्यावर दावा लावता येईल आणि तो जंगम आणि स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्यास, धारण करण्यास व तिची विल्हेवाट करण्यास आणि संविदा करण्यास तसेच या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल.

[6][४. (१) मंडळात राज्य शासन नेमील त्याप्रमाणे, पाचपेक्षा कमी नसतील आणि सात पेक्षा जास्त नसतील इतके सदस्य असतील. ज्या व्यक्ती, त्यांना खादी व ग्रामोद्योगांच्या विकासाशी संबंधित असलेल्या बाबींचा अनुभव असल्यामुळे आणि अशा बाबींसंबंधांतील त्यांची योग्यता दिसून आल्यामुळे राज्य शासनाच्या मते अर्ह असतील, अशा व्यक्तींमधून सदस्यांची निवड करण्यात येईल, आणि ते, राज्य शासनाची मर्जी असे तोपर्यंत अधिकारपद धारण करतील. मंडळाची रचना.

(२) राज्य शासन मंडळाच्या सदस्यांपैकी एका सदस्याची मंडळाचा सभापती म्हणून आणि दुसऱ्याची उप-सभापती म्हणून नेमणूक करील आणि राज्य शासन, उरलेल्या सदस्यांपैकी एक किंवा दोन सदस्यांची, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे मंडळाचा सदस्य-सचिव किंवा मंडळाचे सदस्य-सचिव म्हणूनसुद्धा नेमणूक करील. सर्व सदस्य किंवा त्यांपैकी कोणतेही सदस्य हे राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे, पूर्णकालिक किंवा अंशकालिक सदस्य असतील.

(३) राज्यात, राज्य शासन अधिसूचित करील अशा एका किंवा अनेक ठिकाणी मंडळाचे कार्यालय असेल आणि सर्व पत्रव्यवहार आणि सूचना तेथील पत्त्यांवर पाठविण्यात येतील.

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ४(फ) अन्वये खंड (फ) दाखल करण्यात आला.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम २(क) अन्वये उप खंड (एक-अ) हा समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ अन्वये "किंवा मंडळाची" हे शब्द वगळण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ६(अ) अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६(ब) अन्वये "प्रत्येक मंडळ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये मूळ कलम ४ ऐवजी कलमे ४, ४अ आणि ४ब ही दाखल करण्यात आली.

सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

४-अ. (१) कलम ४ च्या व या कलमाच्या पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांना द्यावयाचे पारिश्रमिक किंवा भत्ते किंवा या दोन्ही गोष्टी या विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील.

(२) पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने—

(अ) सभापतीस, त्याच्या संपूर्ण पदावधीमध्ये आणि पदावधी संपल्याच्या लगतनंतर पंधरा दिवसांच्या कालावधीपर्यंत मुंबईतील निवासस्थानाचा विनाभाडे वापर करण्याचा हक्क असेल किंवा अशा निवासस्थानाच्या ऐवजी विहित केलेल्या दराने घरभत्ता मिळण्याचा हक्क असेल;

(ब) या पोट-कलमामध्ये तरतूद केलेले कोणतेही निवासस्थान सुस्थितीत ठेवण्याच्या संबंधात सभापतीवर व्यक्तीशः कोणताही आकार पडणार नाही;

(क) मंडळास सभापतीच्या वापरासाठी म्हणून वेळोवेळी, मोटारगाडी किंवा इतर योग्य वाहन खरेदी करता येईल व पुरविता येईल; मात्र अशी गाडी किंवा वाहन हे, सुस्थितीत व दुरुस्त स्थितीत ठेवण्यासंबंधात राज्य शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमान्वये निर्धारित करण्यात येतील अशा शर्तींवर देण्यात येईल;

(३) या कलमामध्ये किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य विधानमंडळाच्या सदस्यास, तो मंडळाचा सभापती किंवा सदस्य म्हणून अधिकारपद धारण करीत असताना, पोट-कलम (२) मध्ये तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही, सवलती किंवा कोणतेही पारिश्रमिक अथवा असे अधिकारपद धारण करणारास मंडळाच्या, परिषदेच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीच्या सभेस उपस्थित राहताना किंवा असे अधिकारपद धारण करणारा म्हणून इतर कोणतीही कार्ये पार पाडताना होणारा वैयक्तिक खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून, देण्यात येणारा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा इतर भत्ता यांव्यतिरिक्त भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही;

(४) मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी आणि इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे अध्यक्षाच्या अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करतील.

सदस्याने **अधिकार** पदाचा राजीनामा देणे.

४-ब. मंडळाच्या कोणत्याही सदस्यास, राज्य शासनास उद्देशून आपल्या सहीनिशी लेखी अर्ज करून, कोणत्याही वेळी, आपल्या अधिकार पदाचा राजीनामा देता येईल.]

रिकामी जागा शक्य तितक्या लवकर भरणे.

५. [१][एखादा सदस्य मरण पावल्यास किंवा त्याने राजीनामा दिल्यास] यथास्थिति, त्याच्या मृत्यूच्या तारखेपासून किंवा ज्या तारखेस राजीनामा स्वीकारण्यात आला असेल त्या तारखेपासून तो मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि याप्रमाणे [२][किंवा अन्यथा] रिकामी झालेली कोणतीही जागा, राज्य शासन शक्य होईल तितक्या लवकर भरील :

परंतु, अशा कोणत्याही रिकाम्या जागेच्या कालावधीत जणू काही कोणतीच जागा रिकामी झालेली नसावी त्याप्रमाणे चालू राहिलेल्या सदस्यांना कृती करता येईल.

कार्यवाही उचित व विधिग्राह्य आहे असे गृहीत धरणे.

६. राजीनाम्यामुळे, मृत्युमुळे किंवा अन्यथा [३][मंडळाच्या] सदस्याची कोणतीही जागा रिकामी होती किंवा [३][मंडळाच्या] रचनेत कोणताही दोष होता [४][किंवा मंडळाने कोणत्याही बाबतीत परिषदेचा सल्ला घेतला नव्हता] याच केवळ कारणावरून [३][मंडळाच्या] कोणत्याही कृतीबद्दल किंवा कार्यवाहीबद्दल आक्षेप घेता येणार नाही किंवा अशी कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य ठरविता येणार नाही.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ८(अ) अन्वये "मंडळाचा एखादा सदस्य मरण पावला असेल किंवा कलम ४ यात तरतूद करण्यात आल्याप्रमाणे त्याने राजीनामा दिला असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९(१) अन्वये मंडळ या शब्दाऐवजी हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९(२) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[१][६-अ. (१) मंडळास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी म्हणून त्यास ज्यांचे सहाय्य किंवा ज्यांचा सल्ला आवश्यक आहे असे वाटेल अशा कोणत्याही व्यक्तींना, अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीवर आणि अशा प्रयोजनांसाठी म्हणून, स्वत:शी संबद्ध करून घेता येईल. विशिष्ट प्रयोजनासाठी म्हणून व्यक्तींना मंडळाशी तात्पुरते संबद्ध करून घेणे.

(२) मंडळाने, कोणत्याही प्रयोजनांसाठी म्हणून पोट-कलम (१) अन्वये स्वत:शी संबद्ध करून घेतलेल्या व्यक्तीस, उक्त प्रयोजनाशी संबंधित असेल अशा, मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु तिला मतदानाचा हक्क असणार नाही आणि इतर कोणत्याही प्रयोजनाशी संबंधित असलेल्या बाबींवरील मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेता येणार नाही.

(३) राज्य शासनास, आदेशाद्वारे, मंडळाच्या कोणत्याही सभांमध्ये उपस्थित राहण्यासाठी आणि मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी म्हणून आपले एक किंवा अधिक अधिकारी प्रतिनियुक्त करता येतील, परंतु अशा अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

६-ब. (१) मंडळास या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्यात सहाय्य देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून राज्य शासनास, मंडळाशी विचारविनिमय करून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग परिषद या नावाने संबोधण्यात येणाऱ्या एका परिषदेची रचना करता येईल. परिषदेची रचना.

[२][परिषदेमध्ये,—

(अ) मंडळाचा सभापती आणि इतर सदस्य,

(ब) सर्व जिल्हा समित्यांचे सभापती; आणि

(क) अतिरिक्त सदस्यांपैकी राज्य शासनाला योग्य वाटतील तितके (चारपेक्षा अधिक नसलेले) सदस्य यांचा समावेश असेल,]

या व्यक्ती, खादी व ग्रामोद्योगाच्या विकासाशी संबंधित असलेल्या बाबींचा अनुभव व उक्त बाबीसंबंधी दृढ अभिरुची असल्याकारणाने ज्या व्यक्ती राज्य शासनाच्या मते अर्ह असतील अशा व्यक्तींमधून निवडण्यात येतील.

[३][(१-अ) मंडळाचा सभापती हा परिषदेचा पदसिद्ध सभापती असेल.]

(२) मंडळ, सामान्यत: या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना परिषदेशी विचारविनिमय करील.

(३) परिषदेच्या सदस्यांना [४][विहित करण्यात येईल असे भत्ते देण्यात येतील आणि] ते राज्य शासनाची मर्जी असेतोपर्यंत अधिकारपद धारण करतील.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १० अन्वये कलमे ६अ आणि ६ब ही, समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम ३(अ) अन्वये "परिषदेत" या शब्दाने सुरू होणाऱ्या आणि "असतील" या शब्दाने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] पोट-कलम (१अ) हे वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त सल्लागार आणि इतर अधिकारी व कर्मचारी आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती.

[1][७. (१) मंडळ, आपल्या कारभाराच्या व्यवस्थापनासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नेमील.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी हा, राज्य शासनाने ज्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा मंडळाच्या स्वाधीन केल्या असतील असा शासकीय कर्मचारी असू शकेल; आणि जर तो शासकीय कर्मचारी असेल तर त्याचे पारिश्रमिक, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती या, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

(३) राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन मंडळ निश्चित करील त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये, कर्तव्ये व अधिकार असतील.

(४) मंडळाने राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन, वित्त सल्लागार म्हणून एका व्यक्तीची (सदस्य नसेल अशा) नेमणूक करील. वित्त सल्लागार हा मंडळाचा मुख्य लेखा अधिकारी म्हणूनसुद्धा काम करील.

(५) वित्त सल्लागाराचा पदावधी, त्याच्या सेवेच्या शर्ती व त्याची कार्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) पदे निर्माण करण्यासंबंधात या बाबतीत करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने मंडळास, आपली कार्ये सक्षमतेने पार पाडण्यासाठी म्हणून आवश्यक वाटतील अशी पदे निर्माण करता येतील व असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील.

परंतु, मंडळास, या बाबतीतील आपले अधिकार मंडळाच्या सभापतीकडे व इतर सदस्यांकडे किंवा अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

(७) पोट-कलम (२) व पोट-कलम (५) च्या तरतुदींच्या अधीनतेने मंडळाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे पारिश्रमिक, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती या, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.]

जिल्हा समित्यांची रचना आणि त्यांचे अधिकार व कार्ये.

[2][७-अ. (१) या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने मंडळ, त्याच्या कार्यक्रमाचा ग्रामीण क्षेत्रामध्ये अधिक परिणामकारक प्रभाव पाडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा समिती म्हणून संबोधावयाच्या एका समितीची स्थापना करील. तिच्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| | |
|---|---|
| (अ) मंडळाने राज्य शासनाच्या मान्यतेने सभापती म्हणून नेमावयाची एक अशासकीय व्यक्ती .. | सभापती. |
| (ब) जो सर्वसामान्यपणे जिल्हा समितीच्या समाजकल्याण समितीचा सभापती असेल असा जिल्हा परिषदेचा एक प्रतिनिधी. .. | सदस्य. |
| (क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा सभापती .. | सदस्य. |
| (ड) जिल्हा लीड बँकेचा एक प्रतिनिधी .. | सदस्य. |
| (ई) तीन अशासकीय व्यक्ती .. | सदस्य. |
| यांच्यापैकी निदान एकतरी व्यक्ती ही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती यांपैकी असेल आणि त्यांच्यापैकी एकतरी व्यक्ती स्त्री असेल. | |
| (फ) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था .. .. .. | सदस्य. |
| (ग) जिल्हा उद्योग अधिकारी .. .. .. | सदस्य. |
| (घ) जिल्हा समाज कल्याण अधिकारी .. .. .. | सदस्य. |
| (आय) मंडळाचा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी .. .. | सदस्य-सचिव. |

१९७७ चा महा. ५५.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही जिल्ह्यामध्ये जिल्हा समित्यांची प्रथम रचना करण्यात आल्यानंतर, मंडळाकडून रचना करण्यात आलेल्या व मुंबई खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) अधिनियम, १९७७ याच्या प्रारंभाच्या तारखेला कार्य करीत असलेल्या सर्व विभागीय समित्या, जिल्हा समित्या व तदर्थ समित्या (तशा असल्यास) त्या जिल्ह्यामध्ये कार्य करण्याचे बंद होईल.

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ११ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम ७ दाखल करण्यात आले.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ४ अन्वये कलम ७अ समाविष्ट करण्यात आले.

(३) जिल्हा समित्यांच्या सदस्यांचा पदावधी सर्वसाधारणपणे मंडळाच्या सदस्यांच्या पदावधी इतका असेल. परंतु मंडळास, कोणत्याही वेळी जिल्हा समित्यांपैकी कोणत्याही जिल्हा समितीची पुनर्रचना करणे आवश्यक वाटल्यास, तसे करता येईल.

(४) मंडळास, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने वेळोवेळी, याबाबतीत करण्यात आलेल्या विनियमां-द्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे त्याचे अधिकार (विनियम करण्याच्या अधिकारांखेरीज) व अशी त्याची कार्ये जिल्हा समितीकडे प्रत्यायोजित करता येतील.

(५) जिल्हा समितीकडे प्रत्यायोजित करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा ती समिती योग्य रीतीने वापर करीत नाही असे मंडळाचे मत असेल तर त्यास असे सर्व किंवा कोणतेही अधिकार आणि कार्ये काढून घेता येतील.

(६) जिल्हा समितीच्या कोणत्याही सदस्यास, कोणत्याही वेळी, आपल्या सहीने जिल्हा समितीच्या सभापतीस उद्देशून पत्र लिहून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल.

(७) जिल्हा समितीच्या एखाद्या सदस्याचे अधिकारपद राजीनामा, मृत्यू यांमुळे किंवा अन्यथा, रिकामे झाल्यास मंडळ ते रिकामे अधिकारपद व्यवहार्य असेल तितक्या लवकर भरील.

परंतु, असे कोणतेही अधिकारपद रिकामे असल्याच्या कालावधीत जणू कोणतेच असे अधिकार-पद रिकामे झालेले नसावे त्याप्रमाणे चालू राहिलेल्या सदस्यांना कृती करता येईल.

(८) सदस्यांपैकी कोणाचेही अधिकारपद राजीनामा, मृत्यू यांमुळे किंवा अन्यथा, रिकामे झाल्याच्या कारणावरून किंवा जिल्हा समितीच्या रचनेमध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणावरूनच केवळ जिल्हा समितीच्या कोणत्याही कृतीबाबत किंवा कार्यवाहीबाबत हरकत घेता येणार नाही किंवा ती विधिअग्राह्य ठरविता येणार नाही.

(९) मंडळाच्या विविध परियोजनांचे योग्य व परिणामकारक रीतीने कार्यान्वयन करण्यास जिल्हा समिती जबाबदार असेल व ती मंडळास स्पष्टीकरण देण्यास पात्र राहील.

(१०) जिल्हा समिती आपल्या अधिकारांचा वापर करताना व कार्ये पार पाडताना मंडळाच्या सर्वसाधारण पर्यवेक्षणाखाली काम करील. आणि मंडळाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना व निदेश यांचे पालन करील. कोणत्याही बाबीच्या संबंधात जिल्हा समिती व मंडळ यांच्यामध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास मंडळाचा निर्णय अंतिम असेल.

(११) मंडळाचा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी हा जिल्हा समितीचा प्रमुख कार्यकारी अधिकारी असेल आणि तो जिल्हा समितीकडून किंवा मंडळाकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कामे पार पाडील.

(१२) जिल्हा समितीच्या सभापतीला व इतर सदस्यांना, विहित करण्यात येतील असे भत्ते देण्यात येतील.]

[1][८. (१) याबाबतीत करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने मंडळास, आपली कामे सक्षमतेने पार पाडता यावीत आणि विशेषत: कोणत्याही विशिष्ट खादी व ग्रामो-द्योगाची स्थिती व त्याच्या गरजा विचारात घेऊन अशी कामे पार पडावीत म्हणून वेळोवेळी, एक किंवा अधिक समित्यांची रचना करता येईल. अशा समित्यांची कोणत्याही विनिर्दिष्ट स्थानिक क्षेत्रासाठी रचना करता येईल : समित्यांची नेमणूक.

[2][* * * * * *]

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १२ अन्वये कलम ८ हे बदली दाखल करण्यात आले.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ५(अ) अन्वये "परंतु" या शब्दाने सुरू होणारा व "येईल" शब्दाने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

अशा प्रत्येक समितीत, एक अध्यक्ष व एक सदस्य-सचिव असेल.

[1][* * * * * *]

**मंडळाच्या व परिषदेच्या सभा.** [2][९. या अधिनियमान्वये मंडळ विनियमांद्वारे तरतूद करील अशा वेळी व अशा ठिकाणी मंडळ व परिषद सभा घेईल व त्यांच्या सभांमधील कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धतीबाबतच्या (सभांतील गणपूर्तीसाठीची संख्या ठरविणे धरून) अशा नियमांचे पालन करील.

परंतु, मंडळाची सामान्यत: महिन्यातून निदान एकदा व परिषदेची सामान्यत: दर तीन महिन्यांतून एकदा सभा भरविली पाहिजे.]

**संविदा करण्याचा अधिकार.** १०. (१) मंडळास या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणतेही प्रयोजन पार पाडण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व संविदा करता येतील व त्या पार पाडता येतील.

(२) प्रत्येक संविदा अध्यक्ष [5]या मंडळाच्या वतीने करील.

परंतु, सभापतीस, लेखी आदेशाद्वारे, त्याने त्याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या बाबतीत, याबाबतचे आपले अधिकार उप सभापतीकडे किंवा [3][मंडळाच्या] [4][सदस्य सचिवाकडे अथवा सदस्य सचिवांकडे] किंवा [3][जिल्हा समितीच्या सदस्य सचिवाकडे] सोपविता येतील.

(३) मंडळाच्या वतीने केलेली प्रत्येक संविदा ही, या कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने विहित करण्यात येईल अशा पद्धतीने व अशा नमुन्यात केली पाहिजे.

(४) हे कलम आणि त्याअन्वये केलेले नियम यांत तरतूद केलेल्या रीतीने न केलेली संविदा मंडळावर बंधनकारक असणार नाही.

## प्रकरण तीन

## मंडळाची कार्ये व अधिकार

**मंडळाची कार्ये.** ११. (१) खादी व ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देणे, त्यांचे संघटन, विकास व विनियमन करणे आणि राज्य शासन, वेळोवेळी, विहित करून देईल अशी इतर कार्ये पार पाडणे हे [5][मंडळाचे] कर्तव्य असेल.

२. पोट-कलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, [5][मंडळाने] विशेषे करून पुढील कर्तव्ये आणि कामे यांपैकी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये केली पाहिजेत व कामे पार पाडली पाहिजेत:—

(अ) खादी व ग्रामोद्योग सुरू करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, मदत करणे व ते चालू ठेवणे आणि अशा उद्योगांशी संबंधित असलेला व्यापार किंवा धंदा चालविणे व अशा व्यापाराशी किंवा धंद्याशी आनुषंगिक असलेल्या बाबतीत व्यापार किंवा धंदा चालविणे.

---

[1] हे, सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ५(ब) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १३ अन्वये मूळ कलम ९ ऐवजी हे कलम ९ दाखल करण्यात आले.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ६ द्वारे "किंवा विभागीय समितीच्या सभापतीकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ब) द्वारे "चिटणिसाकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १५ अन्वये "प्रत्येक मंडळाचे" या मजकुराऐवजी "मंडळ" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात आला.

(ब) लोकांना त्यांच्या घरी काम पुरवून मदत करणे आणि विहित करण्यात येतील त्या अटींवर, व्यक्तींना किंवा संस्थांना किंवा परिसंस्थांना कर्ज व अन्य स्वरूपाचे आर्थिक सहाय्य देणे.

(क) खादी व ग्रामोद्योगांसाठी सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे;

(ड) प्रशिक्षण केंद्रे चालविणे व अशा केंद्रांत खादी व ग्रामोद्योग सुरू करण्यासाठी किंवा चालविण्यासाठी लोकांना आवश्यक असणारे ज्ञान प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देणे;

(ई) (एक) खादी व ग्रामोद्योग चालविण्यासाठी आवश्यक असणारी हत्यारे आणि अवजारे तयार करणे, आणि अशा उद्योगांच्या वस्तू तयार करणे;

(दोन) उक्त प्रयोजनासाठी आवश्यक असेल असा कच्चा माल आणि अशी हत्यारे व अवजारे पुरविण्याची व्यवस्था करणे, आणि

(तीन) उक्त उद्योगात तयार झालेल्या मालाची विक्री करणे आणि त्याच्या विक्रीची व्यवस्था करणे.

(फ) भांडारे, दुकाने, विक्रयालये उघडून किंवा प्रदर्शने भरवून खादी व ग्रामोद्योगांपासून तयार झालेल्या वस्तूंच्या प्रसिद्धीची व त्या वस्तू लोकप्रिय करण्याची व्यवस्था करणे व त्या प्रयोजनाकरिता तत्सम उपाय योजणे;

(ग) खादी व ग्रामोद्योगांपासून तयार झालेल्या वस्तूंचा उपयोग करण्याबाबत लोकमत तयार करणे आणि अशा वस्तूंना आश्रय दिल्याने होणारे फायदे जनतेस पटवून देणे.

(ह) खादी व ग्रामोद्योग या विषयातील तज्ञांचा सल्ला आणि मार्गदर्शन घेणे व मिळविणे;

(आय) खादी व ग्रामोद्योगासंबंधातील संशोधन कार्य हाती घेणे आणि त्यास उत्तेजन देणे तसेच या अधिनियमाच्या उद्देशांत आनुषंगिक व सहाय्यक असतील अशी कामे चालविणे;

(जे) या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासन निदेश देईल अशी इतर कर्तव्ये पार पाडणे व अशी इतर कामे करणे.

**मंडळाचे सर्वसाधारण अधिकार.**

१२. या अधिनियमाखालील [१][आपली कर्तव्ये व कार्ये] पार पाडण्याच्या प्रयोजनांकरिता मंडळास पुढील अधिकार असतील.—

(एक) त्यास आवश्यक वाटेल अशी जंगम व स्थावर मालमत्ता संपादन करणे आणि ती धारण करणे आणि अशी कोणतीही मालमत्ता पट्टयाने देणे, विकणे किंवा तिचे अन्यथा हस्तांतरण करणे :

परंतु [२][ज्या स्थावर मालमत्तेच्या संबंधात राज्य शासनाच्या पैशाचा संबंध येत असेल किंवा ज्या मालमत्तेचे मूल्य रुपये २५,००० पेक्षा अधिक असेल अशा] स्थावर मालमत्तेच्या बाबतीत उपरोक्त अधिकार हे राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने वापरले पाहिजेत.

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदी आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या अधीनतेने या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी किंवा राज्य शासन मंडळाकडे सोपवील अशा परियोजना तयार करण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी खर्च करणे आणि आपल्या अधिकारितेखालील कोणत्याही क्षेत्रात कामे हाती घेणे.

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ कलम १९ (अ) अन्वये "आपली कामे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १९(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## प्रकरण चार

### कार्यक्रम आखणे व सादर करणे

वार्षिक कार्यक्रम आखणे व सादर करणे.

१३. (१) प्रत्येक वर्षी, राज्य शासन निश्चित करील, अशा तारखेस [१][ मंडळ ] कामाचा कार्यक्रम तयार करून तो राज्य शासनाकडे सादर करील.

(२) कार्यक्रमात पुढील गोष्टी समाविष्ट असतील—

(अ) मंडळाने पुढील वर्षात भागशः किंवा पूर्णतः जी परियोजना कार्यान्वित करण्याचे योजिले असेल त्या परियोजनेचा तपशील;

(ब) मंडळाने या अधिनियमान्वये आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांकरिता ज्या कोणत्याही कामाची किंवा उपक्रमाची पुढील वर्षात अंमलबजावणी करण्याचे योजिले असेल त्या कोणत्याही कामाचा किंवा उपक्रमाचा तपशील; आणि

(क) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

कार्यक्रमास मंजुरी देणे.

१४. राज्य शासनास संपूर्ण कार्यक्रमास किंवा त्यास योग्य वाटतील असे त्यांत फेरफार करून मान्यता व मंजुरी देता येईल.

अनुपूरक कार्यक्रम.

१५. मंडळास अनुपूरक कार्यक्रम तयार करता येईल व तो राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात आणि अशा तारखेपूर्वी राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविता येईल आणि अशा अनुपूरक कार्यक्रमास कलम १४ च्या तरतुदी लागू असतील.

## प्रकरण पाच

### वित्त व्यवस्था, लेखे, लेखापरीक्षा व ऋणे

मालमत्तेचे हस्तांतरण.

१६. राज्य शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यास योग्य वाटतील अशा शर्तीवर आणि त्या मर्यादांना अधीन ठेवून, मंडळाकडे इमारती, जमीन किंवा इतर कोणतीही मालमत्ता—मग ती जंगम असो वा स्थावर असो—मंडळाकडून तिचा वापर व व्यवस्थापन केले जाण्यासाठी हस्तांतरित करता येईल.

मंडळाचे निधी.

१७. (१) [२][मंडळाचा] स्वतःचा एक निधी असेल आणि मंडळाची सर्व मिळकत त्यात जमा करण्यात येईल. आणि मंडळाने करावयाची सर्व प्रदाने त्यातून चुकती करण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांकरिता मंडळास अनुदाने, अर्थसहाय्य, देणग्या आणि दाने स्वीकारता येतील आणि शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही निकायाकडून किंवा अधिसंघाकडून मग ते नियमित असो वा नसो—किंवा एखाद्या व्यक्तीकडून कर्जे घेता येतील.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम १७ अन्वये, "प्रत्येक मंडळ" या मजकुराऐवजी "मंडळ" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २०(अ) अन्वये, "प्रत्येक मंडळ" या मजकुराऐवजी "मंडळ" हा मजकूर त्याच्या, व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(३) मंडळाच्या निधीचा सर्व पैसा, राज्य शासन, विशेष अथवा सर्वसाधारण आदेशाद्वारे निदेश देईल, त्या रीतीने जमा करण्यात येईल.

(४) मंडळ ज्यांस प्राधिकृत करील ते अधिकारीच संयुक्तपणे अथवा व्यक्तिशः मंडळाच्या पैशाचा व्यवहार चालवतील.

[१][१७-अ. (१) मंडळास एक राखीव निधी स्थापन करता येईल व त्यामध्ये, विहित करण्यात येईल असा त्याच्या निधीचा भाग हस्तांतरित करता येईल. मंडळाचा राखीव निधी.

(२) राखीव निधीचे व्यवस्थापन त्याच्या जमाखाती वेळोवेळी घालावयाच्या रकमा आणि त्यामध्ये समाविष्ट असलेल्या पैशाचे उपयोजन या गोष्टी विहित करण्यात येईल अशा रीतीने निर्धारित करण्यात येतील.]

१८. मंडळाजवळ असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि अन्य मत्ता ही, मंडळ या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने आणि अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता धारण करील आणि त्यासाठी तिचे उपयोजन करील. निधी आणि मालमत्ता यांचे उपयोजन.

१९. (१) राज्य शासनास, प्रत्येक बाबतीत ते निर्धारित करील अशा शर्तींवर आणि अटींवर या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी मंडळास वेळोवेळी अर्थसहाय्य व कर्जे देता येतील. मंडळास अर्थसहाय्य व कर्जे देणे.

(२) मंडळास वेळोवेळी राज्य शासनाची पूर्वसंमती घेऊन आणि या अधिनियमाच्या तरतुदीस आणि राज्य शासन निर्धारित करील त्या अटींच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता लागणारी कोणतीही रक्कम कर्ज म्हणून घेता येईल.

[२][परंतु, आयोगाकडून [३][एक कोटी रुपयांपेक्षा] अधिक नसेल अशी रक्कम—

(अ) कोणतीही खादी किंवा ग्रामोद्योगविषयक परियोजना कार्यान्वित करावयाच्या प्रयोजनासाठी, किंवा

(ब) अशी कोणतीही परियोजना कार्यान्वित करण्यासाठी म्हणून, कोणत्याही व्यक्तीस, किंवा अधिसंघास किंवा परिसंस्थेस मग ती निर्गमित असो वा नसो कर्जाच्या रूपाने आगाऊ रक्कम देण्यासाठी;

कर्जाऊ घ्यावयाची असेल तेव्हा, अशी पूर्वमंजुरी घेण्याची आवश्यकता असणार नाही.]

[४][१९-अ. खादी उत्पादन तंत्रविषयक किंवा कोणत्याही ग्रामोद्योग विकासविषयक प्रयोग व संशोधन करण्यासाठी म्हणून, विहित करण्यात येईल अशा मर्यादेपेक्षा अधिक नसेल इतका खर्च करण्याचा सभापतीस अधिकार असेल.] संशोधन व प्रयोग यासाठीचा खर्च.

२०. [५][मंडळ], राज्य शासन निश्चित करील त्या दिवशी आपल्या अर्थसंकल्प कार्यक्रमाप्रमाणे आणि मालमत्तेच्या सूचीप्रमाणे आपल्या भांडवलावर आणि महसुलावर अंदाजलेली मिळकत व खर्च दर्शविणारा पुढील वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प तयार करील व तो राज्य शासनास सादर करील. अर्थसंकल्प.

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २१ अन्वये कलम १७अ समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २३(ब)(दोन) अन्वये हे परंतुक, जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम ७ अन्वये "विहित करण्यात येईल अशा मर्यादेपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम २४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलमे २५, २८ व २९ अन्वये, "प्रत्येक मंडळ" या शब्दाऐवजी "मंडळ" हे शब्द दाखल करण्यात आले.

अर्थसंकल्पास मंजुरी देणे. २१. (१) राज्य शासनास, त्याच्याकडे सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात, त्यास योग्य वाटतील असे फेरफार करून मंजुरी देता येईल.

(२) प्रारंभी मंजूर केलेल्या कोणत्याही परियोजनेच्या खर्चात ३३⅓ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ होणार नाही या शर्तीच्या अधीनतेने मंडळ एका परियोजनेवरील रकमांचे पुर्नविनियोजन आवश्यक असेल त्याप्रमाणे दुसऱ्या परियोजनेवर करण्यास सक्षम असेल.

[१]* * * *

अनुपूरक अर्थसंकल्प. २२. [२][मंडळास] राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात आणि अशा तारखेपूर्वी शासनाच्या मंजुरीसाठी अनुपूरक अर्थसंकल्प सादर करता येईल आणि कलम २१ च्या तरतुदी अशा अनुपूरक अर्थसंकल्पास लागू होतील.

वार्षिक अहवाल. २३. [२][मंडळ] विहित करण्यात येईल अशा रीतीने वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या आत मागील वर्षभरातील आपल्या कामांचा पूर्ण तपशील दिलेला एक वार्षिक अहवाल तयार करील व तो [३]* * * राज्य शासनाकडे पाठवील.

असा प्रत्येक अहवाल राज्य शासनाला मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर तो राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

आणखी अहवाल, आकडेवारी व विवरणपत्रे. २४. [२][मंडळ] राज्य शासनाकडून वेळोवेळी निदेश देण्यात येईल त्या तारखेपूर्वी आणि अशा कालांतराने आणि अशा रीतीने राज्य शासन निदेश देईल अशा गोष्टींसंबंधी आणि अशा आकडेवारीसंबंधी अहवाल आणि अशी विवरणपत्रे राज्य शासनाकडे सादर करील.

लेखे व लेखा परीक्षा. [४][२५. (१) मंडळ, यथायोग्य लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, [५][जमा व प्रदानाबद्दलचा लेखा] व ताळेबंद धरून, वार्षिक लेखा विवरण तयार करील.

[६][मंडळ त्याच्याकडून वाणिज्यिक तत्त्वांवर चालविण्यात येणाऱ्या युनिटांचे रीतसर नमुन्यामध्ये वाणिज्यिक लेखे ठेवील व ते कलम २३ अन्वये राज्य शासनाकडे पाठवावयाच्या वार्षिक अहवालांमध्ये दर्शवील].

(२) राज्य शासन याबाबतीत नेमील अशा व्यक्तींकडून, मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये नेमण्यात आलेल्या लेखापरीक्षकास, मंडळाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेच्या संबंधित, विहित करण्यात येतील असे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतील. आणि त्यास विशेषकरून, मंडळाची पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके, इतर दस्तऐवज व कागदपत्रे यांची मागणी करण्याचा व मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा हक्क असेल.

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २६(ब) अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलमे २५, २८ व २९ अन्वये "प्रत्येक मंडळ" याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम ३७, कलम ३ अन्वये "कलम २५ मध्ये उल्लेखिलेल्या हिशोबांच्या वार्षिक विवरणपत्रकाच्या प्रतीसहीत" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३० अन्वये कलम २५ हे बदली दाखल करण्यात आले.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम ८(अ) अन्वये "नफा व तोटा याबद्दलचा हिशोब" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(४) लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले मंडळाचे लेखे व त्यासंबंधातील लेखापरीक्षकाचा अहवाल, हा राज्य शासन या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा तारखेपूर्वी राज्य शासनाकडे दरवर्षी सादर करणत येईल.

[१][(४अ) राज्य शासन, पोट-कलम (४) अन्वये त्याच्याकडे पाठवण्यात आलेले मंडळाचे लेखे व त्यावरील लेखापरीक्षकाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची तजवीज करील.]

(५) लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या अवलोकनानंतर राज्य शासनाला जे निदेश देणे योग्य वाटेल अशा निदेशांचे मंडळ अनुपालन करील.]

---

## प्रकरण सहा

### संकीर्ण

राज्य शासनाने निदेश देणे.

**२६.** (१) [२][मंडळाने] आपली कामे पार पाडताना, धोरणविषयक प्रश्नावर राज्य शासन त्यास जे निदेश देईल, त्याप्रमाणे वागेल.

(२) राज्य शासन आणि [२][मंडळ] यांमध्ये, एखादा प्रश्न हा धोरणविषयक प्रश्न आहे किंवा नाही याबद्दल कोणताही वाद उद्‌भवला तर राज्य शासनाचा निर्णय हा अंतिम असेल.

मंडळास येणे असलेल्या पैशांची जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली.

[३][**२६अ.** [४][(१) जेव्हा कोणत्याही स्पष्ट किंवा गर्भित करारान्वये किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे मंडळास देण्याजोगी असलेली कोणतीही रक्कम, नियत तारखेस किंवा तत्पूर्वी दिली नसेल आणि मागणी वादग्रस्त नसेल तर, मुख्य कार्यकारी अधिकारी, आपल्या सहीने, मंडळास देणे असलेली रक्कम दर्शविणारे एक प्रमाणपत्र पाठवील; आणि त्यानंतर, पोट-कलम (२) च्या अधीनतेने देणे असलेली अशी रक्कम, जिल्हाधिकारी, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करील.]

(२) एखादी रक्कम पोट-कलम (१) च्या अर्थानुसार मंडळास देण्याजोगी आहे किंवा कसे याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, तो प्रश्न राज्य शासनाने त्या प्रयोजनासाठी रचना केलेल्या न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात येईल आणि न्यायाधिकरण, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि अशी रक्कम ज्या व्यक्तीने देणे आहे असे अभिकथित केलेले असेल त्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्या प्रश्नाचा निर्णय करील; आणि न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व त्यास कोणत्याही न्यायालयात किंवा इतर प्राधिकरणात हरकत घेता येणार नाही.

(३) न्यायाधिकरणात एकच व्यक्ती असेल व तिचा मंडळाशी किंवा ज्या व्यक्तीने अशी रक्कम देणे आहे असे अभिकथित केलेले असेल त्या व्यक्तीशी संबंध असता कामा नये.

(४) न्यायाधिकरणाचा खर्च मंडळाने सोसला पाहिजे.]

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम ३७, कलम ४ अन्वये पोट-कलम (४अ) हे, समाविष्ट करण्यात आले.

[२] "सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८. कलम ३१ अन्वये "प्रत्येक मंडळ" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये कलम २६-अ हे समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३२ अन्वये पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

तोटे निर्लेखित करण्याचा मंडळाचा अधिकार.

[1][२६-ब. (१) मंडळ पुढील प्रकारच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रकरणात, एकेका प्रकरणात पाचशे रुपयांपर्यंत परंतु कोणत्याही वित्तीय वर्षात एकूण पाच हजार रुपयांहून अधिक होणार नाही इतक्या रकमेचा तोटा निर्लेखित करण्यास सक्षम असेल—

(अ) चोरी, कपट किंवा अशाच इतर कारणांमुळे भांडारातील किंमती वस्तूंचे वसूल न होण्याजोगे झालेले नुकसान किंवा सार्वजनिक पैशाचे झालेले नुकसान;

(ब) कर्जाव्यतिरिक्त, आगाऊ दिलेल्या ज्या रकमा वसूल न होण्याजोग्या असतील अशा रकमांमुळे झालेले नुकसान; आणि

(क) भांडाराच्या किंमतीत होणारी घट किंवा घसारा;

सभापती हा, वित्त सल्लागाराशी अगोदर विचारविनिमय करून एकेका प्रकरणांत दोनशे रुपयांपर्यंत, परंतु कोणत्याही वित्तीय वर्षात एकूण दोन हजार रुपयांहून अधिक होणार नाही इतकी रक्कम निर्लेखित करण्यास सक्षम असेल.

(२) कोणतेही नुकसान निर्लेखित केल्यानंतर, मंडळ त्याबाबतचा तपशीलवार अहवाल, नुकसानीस जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध केलेल्या कारवाईवरील (तशी कारवाई असल्यास) अहवालासह राज्य शासनाकडे सादर करील:

परंतु दोनशे रुपयांहून अधिक नुकसान नसलेली प्रकरणे राज्य शासनाला कळविणे आवश्यक असणार नाही. मात्र अशा नुकसानीशी संबंधित असलेल्या आणि ज्यांची योग्य रीतीने तपासणी करणे व ज्यांच्यावर विचार करणे आवश्यक आहे अशा महत्त्वाच्या गोष्टी ज्या प्रकरणांत अंतर्भूत असतील अशी प्रकरणे जर मंडळाच्या मते राज्य शासनाकडे पाठविणे आवश्यक असेल तर ती पाठवली पाहिजेत.]

मंडळाचे सदस्य व मंडळाचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

२७. मंडळाचे सदस्य [2][ जिल्हा समित्यांचे सदस्य ] व मंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी हे, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींस अनुसरून काम करीत असतील किंवा ते काम करीत असल्याचे दिसून येत असेल तेव्हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार ते लोकसेवक आहेत असे मानण्यात येईल १८६० चा ४५.

या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

२८. या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा केले असल्याचे दिसून येणाऱ्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही चालविता येणार नाही.

नियम.

[3][२९. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३३ अन्वये कलम २६ब हे समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५ याच्या कलम ९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३५ अन्वये कलम २९ हे, बदली दाखल करण्यात आले.

(२) विशेषत: व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढील-पैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींची तरतूद करता येईल :—

(अ) मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि तात्पुरते रिकामे अधिकारपद भरण्याची रीत, मंडळाचे सभापती, उप-सभापती, सदस्य-सचिव किंवा सचिव आणि इतर सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती तसेच त्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते व मंडळाचे सदस्य या नात्याने त्यांच्या कर्तव्याशी संबंधित असलेल्या कामासाठी ते दौऱ्यावर असताना त्यांना द्यावयाचे प्रवास भत्ते व दैनिक भत्ते.

(ब) मंडळाच्या किंवा परिषदेच्या [1][किंवा जिल्हा समित्यांच्या] सदस्यत्वासंबंधीच्या निरर्हता आणि जो निरर्ह असेल किंवा निरर्ह ठरेल अशा सदस्यास पदावरून दूर करताना अनुसरावयाची कार्यपद्धती;

(क) कलम ४-अ, पोट-कलम (३) च्या तरतुदीच्या अधीनतेने, मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, त्यांनी आपली कर्तव्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि त्यांची नैमित्तिक रिकामी पदे भरण्याची रीत;

(ड) सभापती, उप-सभापती व सदस्य-सचिव यांनी वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कामे;

[2][(ड ड) कलम ६-ब अन्वये परिषदेच्या सदस्यांना, [3][व कलम ७-अ पोट-कलम (१२) अन्वये जिल्हा समित्यांच्या सदस्यांना,] द्यावयाचे भत्ते.

(इ) वित्त सल्लागाराचा पदावधी, त्याच्या सेवेच्या शर्ती व त्याची कार्ये;

(फ) [4]* * * * *

(ग) कलम १० अन्वये ज्या रीतीने व ज्या नमुन्यात संविदा केली पाहिजे ती रीत व तो नमुना;

(ह) कलम ११ अन्वयेची मंडळाची कार्ये;

(आय) कलम १३ खालील कार्यक्रमाचा इतर तपशील;

(जे) कलम १५ खाली ज्या नमुन्यात व ज्या तारखेपूर्वी अनुपूरक कार्यक्रम सादर केला पाहिजे तो नमुना व ती तारीख;

(के) मंडळाच्या निधीचा जो भाग राखीव निधीकडे हस्तांतरित करता येईल तो भाग. निधीची व्यवस्था आणि राखीव निधीच्या जमाखाती वेळोवेळी घालावयाच्या रकमा आणि त्यात समाविष्ट केलेल्या पैशाचे कलम १७-अ खाली उपयोजन;

(ल) कलम १९-अ खाली ज्या मर्यादेपर्यंत सभापतीला खर्च करता येईल ती मर्यादा;

(म) कलम २२ खाली ज्या नमुन्यात व ज्या तारखेपूर्वी अनुपूरक अंदाजपत्रक सादर केले पाहिजे तो नमुना व ती तारीख;

(न) कलम २३ खाली ज्या रीतीने वार्षिक अहवाल तयार करण्यात येईल व राज्य शासनाकडे पाठवण्यात येईल ती रीत;

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम १०(अ) अन्वये हे शब्द, समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम ३७, कलम ५ अन्वये खंड (डड) हा, समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम १०(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १०(क) अन्वये खंड (फ) हा, वगळण्यात आला.

(ओ) कलम २५ खाली [1][जमा व प्रदान लेखा] व ताळेबंद धरून वार्षिक लेखा विवरण ज्या नमुन्यात तयार केले पाहिजे तो नमुना, ज्या कालांतराने लेखापरीक्षा केली जाईल तो कालांतरांचा अवधी व लेखापरीक्षकास असतील असे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार;

(पी) कलम २६-अ, पोट-कलम (२) खाली न्यायाधिकरणाने त्याच्याकडे पाठविलेल्या प्रश्नांवर निर्णय घेताना अनुसरावयाची कार्यपद्धती;

[2][(पी ए) मंडळ ज्या सेवा देईल त्यासाठी मंडळ आकारील अशी कोणतीही वाजवी फी आणि अशा फीचे दर; ]

(क्यू) या अधिनियमान्वये विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिती, तो नियम अंमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरफार किंवा निरसन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

विनियम. [3][३०. (१) मंडळास, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, या अधिनियमान्वये त्याची कर्तव्ये व कार्ये पार पाडणे शक्य व्हावे म्हणून या अधिनियमाशी व नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील आणि ते **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करता येतील.

(२) विशेषकरून, आणि पूर्वगामी धिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा विनियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही पूर्वसाठी तरतूद करता येईल :—

(अ) मंडळाच्या आणि परिषदेच्या सभांची वेळ व ठिकाण, अशा सभांमध्ये कामकाज पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि सभेचे असे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेली गणपूर्ती;

(ब) ज्या रीतीने, व ज्या शर्तींच्या अधीनतेने आणि ज्या प्रयोजनांसाठी कलम ६-अ खाली मंडळास व इतर व्यक्तींना संबद्ध करून घेता येईल ती रीत, त्या शर्ती व ती प्रयोजने;

(क) कलम ७ खालील मंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे पारिश्रमिक भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती;

(ड) समित्यांची कार्ये आणि त्यांनी त्यांची कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि [4][कलम ७-अ अन्वये जिल्हा समित्यांकडे] मंडळाचे अधिकार व कार्ये प्रत्यायोजित करणे, व कलम ४-अ, पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने, समित्यांच्या सदस्यांना, समित्यांच्या सभांस उपस्थित राहण्याकरिता किंवा समितीचा सदस्य या नात्याने इतर कार्ये पार पाडण्याकरिता द्यावयाचे भत्ते;

---

[1] "सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, याच्या कलम १०(ड) अन्वये "नफा-तोटयाचा हिशेब" या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १०(इ) अन्वये खंड (पीए) हा समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ३५ अन्वये कलम ३० बदली दाखल करण्यात आले.

[4] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ११ अन्वये "कलम ८ अन्वये विभागीय व जिल्हा समित्यांकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(इ) मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी किंवा कोणताही कर्मचारी यांच्याकडे अधिकार व कर्तव्ये प्रत्योजित करणे ;

(फ) मंडळाच्या वतीने, ज्या व्यक्तींना आणि ज्या रीतीने रकमांचे प्रदान करता येईल, रकमा ठेव म्हणून ठेवता येतील किंवा त्या गुंतविता येतील, त्या व्यक्ती व ती रीत आणि मंडळाच्या चालू खर्चासाठी लागणाऱ्या पैशांची अभिरक्षा व न लागणाऱ्या पैशांची गुंतवणूक;

(ग) लेखे ठेवणे.

(३) राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या कलमान्वये केलेला कोणताही विनियम रद्द करता येईल; आणि त्यानंतर तो विनियम परिणामक असण्याचे बंद होईल].

मंडळाचे विसर्जन.

[१][३१. (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून मंडळ विसर्जित करण्यात यावे असा निदेश देता येईल; आणि त्यानंतर, मंडळ त्याप्रमाणे विसर्जित झाले असल्याचे मानण्यात येईल, आणि परिषद व रचना केलेल्या [२][जिल्हा समित्या व इतर कोणत्याही समित्या] यांची कामे बंद होतील.

(२) उक्त तारखेस आणि त्या तारखेपासून,––

(अ) उक्त तारखेच्या निकटपूर्वी, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळाच्या कब्जात असलेली सर्व मालमत्ता आणि निधी राज्य शासनामध्ये निहित होतील ;

(ब) सर्व सदस्य, मंडळाचे सदस्य म्हणून असलेले आपले अधिकारपद रिकामे करतील; आणि

(क) मंडळाचे सर्व हक्क, आबंधने व दायित्वे (कोणत्याही संविदेखालील कोणतीही दायित्वे धरून) ही अनुक्रमे राज्य शासनाचे हक्क, आबंधने आणि दायित्वे होतील.

१९६४ चा महा. ५.
१९५६ चा ६१.

राज्य शासनाचे हक्क व दायित्वे मंडळाकडे हस्तांतरित करणे.

[३][३१-अ. मुंबई खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) अधिनियम, १९६३ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वी राज्य शासनाने संपादन केलेले किंवा त्यास प्राप्त झालेले आणि त्या तारखेस अस्तित्वात असलेले खादी व ग्रामोद्योग आयोग अधिनियम, १९५६ अन्वये रचना केलेल्या खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या अधिकाराच्या कक्षेत राज्याच्या विदर्भ विभागात आणि हैदराबाद क्षेत्रात ग्रामोद्योग परियोजनांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधातील हक्क व दायित्वे असलेले कोणतेही हक्क किंवा पत्करलेली आबंधने किंवा दायित्वे (कोणत्याही संविदेखालील हक्क, आबंधने व दायित्वे धरून) त्या तारखेपासून महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे हस्तांतरित होतील आणि त्यामध्ये निहित होतील, आणि हक्क असे, आबंधने व दायित्वे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे हक्क, आबंधने व दायित्वे बनतील; आणि त्यानुसार अशा कोणत्याही हक्कांच्या, आबंधनाच्या किंवा दायित्वांच्या संबंधातील कोणत्याही लेखात किंवा दस्तऐवजात राज्याच्या राज्यपालाचा किंवा राज्य शासनाचा कोणत्याही शद्वात केलेला कोणताही उल्लेख किंवा राज्यपालाच्या किंवा राज्य शासनाच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याचा कोणताही उल्लेख हा उक्त तारखेनंतर, उक्त मंडळाचा किंवा मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे असा त्याचा अर्थ लावण्यात येईल].

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३६ अन्वये कलम ३१ बदली दाखल करण्यात आले.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम १२ अन्वये "आणि कोणत्याही समित्या" या मजकुराऐवजी , हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम ५, कलम २ अन्वये कलम ३१-अ हे समाविष्ट करण्यात आले.

निरसन व व्यावृत्ती. ३२. (१) मुंबई खादी व ग्रामोद्योग अध्यादेश, १९६०, याच्या प्रारंभाच्या तारखेस (जिचा यानंतर या कलमात आणि कलम ३३ मध्ये, "नेमलेला दिवस" म्हणून उल्लेख केला आहे) पुढील अधिनियम निरसित होतील :— १९६० चा मुंबई अध्या. ३.

१९५३ चा सौराष्ट्र ४०. (एक) सौराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ अधिनियम, १९५३;

१९५४ चा मुंबई ४१. (दोन) मुंबई ग्रामोद्योग अधिनियम, १९५४;

१९५५ चा हैद्राबाद १२. (तीन) मुंबई राज्याच्या हैद्राबाद प्रदेशास लागू असलेला हैद्राबाद व खादी ग्रामोद्योग, मंडळ अधिनियम, १९५५; आणि

१९५६ चा मध्य प्रदेश १०. (चार) मुंबई राज्याच्या विदर्भ प्रदेशास लागू असलेला मध्य प्रदेश व खादी ग्रामोद्योग मंडळ अधिनियम, १९५६.

१९५४ चा मुंबई ४१. १९६० चा मुंबई अध्यादेश ३. (२) मुंबई ग्रामोद्योग अधिनियम, १९५४ हा निरसित करण्यात आला असला तरीही उक्त अधिनियमान्वये केलेले व नमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले नियम व विनियम हे, मुंबई खादी व ग्रामोद्योग अध्यादेश, १९६० याअन्वये केलेल्या कोणत्याही कृत्याच्या किंवा केलेल्या कोणत्याही कार्यवाहीच्या अधीनतेने आणि ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, संपूर्ण राज्याच्या संबंधात या अधिनियमान्वये केलेले नियम व विनियम आहेत असे मानण्यात येईल आणि ते या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे ते त्यांचे अधिक्रमण झाल्याशिवाय आणि त्यांचे अधिक्रमण करण्यात येईतोपर्यंत त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

विद्यमान मंडळ विसर्जित करणे व त्याच्या मत्ता आणि दायित्वे नवीन मंडळाकडे हस्तांतरित करणे. [1][३३. (१) मुंबई खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) अधिनियम, १९६५ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये मंडळाची स्थापना करण्यात आल्यानंतर उक्त मंडळाची, (ज्याचा यात यापुढे "विद्यमान मंडळ" असा उल्लेख करण्यात आला आहे) अशी स्थापना होण्याच्या निकटपूर्वी काम करीत असलेले महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ हे, विसर्जित होईल; आणि त्या मंडळाचे सदस्य आपले अधिकारपद रिकामे करतील. १९६५ चा महा. २८.

(२) वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे मंडळाची स्थापना करण्यात आल्यानंतर विद्यमान मंडळाच्या मत्ता, हक्क व दायित्वे (विद्यमान मंडळाने केलेल्या कोणत्याही संविदेखालील हक्क व दायित्वे धरून) या नवीन मंडळाकडे जातील व त्या विद्यमान मंडळाच्या मत्ता, हक्क व दायित्वे होतील आणि त्या मंडळामध्ये निहित होतील.

(३) जेव्हा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे मंडळाच्या स्थापनेच्या निकटपूर्वी, विद्यमान मंडळ हे, मंडळाकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही मत्तेच्या, हक्कांच्या किंवा दायित्वाच्या संबंधात, कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर, प्राधिकरणासमोर किंवा अधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाह्यांमध्ये पक्षकार असेल तर, विद्यमान मंडळाऐवजी मंडळ, त्या कार्यवाह्यात पक्षकार असल्याचे मानण्यात येईल व त्यानुसार कार्यवाह्या पुढे चालू ठेवण्यात येतील.

(४) वर निर्दिष्ट केलेल्या मंडळाच्या स्थापनेच्या निकटपूर्वी, जी व्यक्ती विद्यमान मंडळाचा कर्मचारी असेल अशी प्रत्येक व्यक्ती मंडळाच्या स्थापनेपासून, अशा स्थापनेच्या लगतपूर्वीचे वेतन धरून ज्या अटी व शर्ती त्याला लागू होत्या, त्याच अटींवर व शर्तींवर मंडळाचा कर्मचारी असल्याचे मानण्यात येईल.

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३७ अन्वये कलम ३३ बदली दाखल करण्यात आले.

(५) पोट-कलम (४) मधील कोणत्याही मजकुरामुळे, मंडळाचा कर्मचारी असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सेवेच्या शर्ती योग्य रीतीने ठरविण्यासंबंधातील मंडळाच्या हक्कास, मंडळाच्या स्थापनेनंतर, बाध येतो असे मानण्यात येणार नाही :

परंतु, मंडळाच्या स्थापनेच्या निकटपूर्वी अशा कोणत्याही व्यक्तीबाबत लागू होणाऱ्या शर्तीमध्ये राज्य शासनाची आगाऊ मान्यता घेतल्याशिवाय त्या व्यक्तीला अहितकारक होतील अशा रीतीने फेरफार करण्यात येणार नाहीत.]

३४. कलम ३३ च्या तरतुदी परिणामक करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल त्याप्रमाणे व या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३५. शंका दूर करण्यासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, संसदेने कायद्याद्वारे ज्या उद्योगांवर लोकहिताच्या दृष्टीने संघराज्याचे नियंत्रण ठेवणे इष्ट असल्याचे जाहीर केले असेल त्या कोणत्याही उद्योगांस या अधिनियमातील कोणताही मजकूर लागू असणार नाही. शंका दूर करणे.

१९६० चा मुंबई अध्या. देश ३. १९०४ चा मुंबई १. ३६. मुंबई खादी व ग्रामोद्योग अध्यादेश, १९६० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे आणि जणू तो अध्यादेश म्हणजे अधिनियमिती असावी त्याप्रमाणे सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याची कलमे ७ व २५ यांच्या तरतुदी अशा निरसनास लागू असतील. सन १९६० चा मुंबई अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन.

[1]* * *

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ३८ अन्वये अनुसूची वगळण्यात आली.